# जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहिर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे चिखली गट नं. १२४४ व १२४७ नेवाळे वस्ती येथिल नागरिकांना रहदारीचा रस्ता नाही. त्यामुळे स्थानिक नागरिकाच्या सोईसाठी मौजे चिखली गट नं. १२४४ व १२४७ येथे साने चौक ते चिखलीगाव मुख्य रस्त्यापासून जयहरी सोसायटी कडे जाणारा रस्ता सुमारे १५ ते २० फुट रुंदीचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम २०५ नुसार घोषीत करण्यास सदस्य प्रस्तावास मा. फ प्रभाग समिती ठराव क्र. २, दिनांक ०४/०१/२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे. तथापी महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम १०.३ नुसार सदरच्या ठिकाणी ३०० मी. पेक्षा जास्त लांबीच्या रस्त्यासाठी किमान १२.०० मी. रुंद रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम २०५ नुसार प्रस्तावित करणे आवश्यक असल्याने मौजे चिखली गट नं. १२४४ व १२४७ या मिळकती मधून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम २०५ नुसार १२.०० मी. रुंद रस्ता म्युनिसीपल रस्ता म्हणून घोषीत करण्याचा इरादा जाहिर केलेला आहे.

सदर घोषीत करावयाच्या रस्त्याचा आराखडा नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागात उपलब्ध करण्यात आलेला आहे. याबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत / सुचना असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत आवश्यक त्या कागदपत्रांसह लेखी स्वरुपात द्यावी. सदर मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती / सुचनांवर योग्य तो विचार करुन इराद्याप्रमाणे महानगरपालिका रस्ता (म्युनिसीपल रोड ) घोषीत करण्यात येईल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही हरकती / सुचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

ठिकाण – पिंपरी, पुणे.
दिनांक- १४ / ४ /२०१८

जाहिरात क्रमांक १२१६

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे - ४११०१८

( टिप- सदर सुचना व नकाशा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईट वरही उपलब्ध आहे.)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
वाढीव हद्दीचा सुधारित मंजूर विकास योजनेत
महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम २०१२चे कलम २०५ अन्वये प्रस्तावित फेरबदल.
फेरबदलाचा नकाशा
(मौजे – चिखली व सभोवतालचा परिसर)




(प्रमाण - १:५०००)

खुलासा:-

मंजूर विकास योजना आरक्षण

मंजूर विकास योजना रस्ते / रस्तारुंदी

रहिवास विभाग

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम २०१२ चे कलम २०५ अन्वये प्रस्तावित १२ मी रुंद रस्ता असे(मौजे चिखली ग नं १२४४ व १२४७ मधील प्रस्तावित १२ मी रस्ता असे)

उपसंचालक
नगररचना व विकास विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी,पुणे – ४११०१८

आयुक्त
नगररचना व विकास विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी,पुणे – ४११०१८